Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date: 27 April 2024

Time: 01.00 to 01.05 PM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: २७ एप्रिल २०२४ दुपारी १.०० वा.**

****

लोकसभा निवडणुकीच्या उर्वरित टप्प्यांसाठी प्रचाराला वेग आला आहे.

भाजपचे ज्येष्ठ नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी आज कोल्हापूर इथं, कोल्हापूर लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार संजय मंडलिक तर हातकणंगलेचे उमेदवार धैर्यशील माने यांच्या प्राचारार्थ सभा घेणार आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल सभास्थळाची पाहणी केली.

दरम्यान, लातूर इथले महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ शिवाजी काळगे यांच्या प्रचारासाठी काँग्रेस पक्षाच्या नेत्या प्रियंका गांधी यांची आज उदगीर इथं सभा होणार आहे. जिल्हा परिषद मैदानावर ही सभा होईल.

****

निवडणूक आयोगानं नागरिकांना हवी असलेली माहिती मिळवणं आणि तक्रारी नोंदवण्यासाठी नॅशनल ग्रीव्हन्स सर्व्हिस पोर्टल – एन जी एस पी कार्यान्वित केलं आहे. या पोर्टलवर आलेल्या कॉल्सना सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. निवडणूक ओळखपत्र, मतदार केंद्र, मतदानासाठी आवश्यक ओळखपत्रं आदींविषयक माहिती या पोर्टलवर नागरिकांमार्फत विचारण्यात येते. आतापर्यंत अशा ८ हजाराहून अधिक कॉल्सना या पोर्टलच्या माध्यमातून उत्तर देण्यात येऊन या नागरिकांचं शंका समाधान करण्यात आलं आहे. या पोर्टलवर दाखल झालेल्या सर्व तक्रारींपैकी सुमारे ७५ टक्क्यांहून अधिक तक्रारी या मतदार ओळखपत्राशी संबंधित असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

परभणी इथं काल मतदान केलेल्या नागरिकांना दोन दिवस रक्त तपासणीत ३० टक्के सवलत देण्यात येणार आहे. जिल्हा पॅथॉलॉजी लॅब असोसिएशनच्या वतीनं, मतदानाची केल्याची बोटावरची शाई दाखवून या सवलतीचा लाभ घेता येणार

असल्याची माहिती, डॉ विजय बोंडे यांनी दिली. तर इंडियन मेडिकल असोसिएशनच्या वतीनं, मतदान केलेल्या नागरिकांना तपासणी फीमध्ये ३० टक्के सवलत देण्यात येणार असल्याचं, डॉक्टर असोसिएशनचे अध्यक्ष डॉ राजगोपाल कलानी यांनी सांगितलं.

****

बीड इथं उद्या रविवारी मतदार जागृतीसाठी सायकल फेरीचं आयोजन करण्यात आलं आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनातून या फेरीला सुरुवात करण्यात येईल.

****

बारामती मतदारसंघातल्या निवडणूक प्रचार मेळाव्यात उपमुख्यमंत्री अजित पवार, भाजप नेते चंद्रकांत पाटील यांच्याकडून आदर्श आचारसंहितेचा भंग झाला नसल्याचा अहवाल बारामती लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी दिला आहे. संबंधित प्रचार मेळाव्यात बोलताना पवार यांनी निधीच्या बदल्यात मत देण्याबाबतचं वक्तव्य केल्याची तक्रार राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं केली होती.

****

लोकसभा निवडणुकीचा आढावा घेणारा 'लोकनिर्णय महाराष्ट्राचा' हा कार्यक्रम, आकाशवाणीनं सुरू केला आहे. कार्यक्रमाच्या आजच्या भागात आपण उस्मानाबाद लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात वाजता आकाशवाणीच्या मुंबई केंद्रावरून हा कार्यक्रम प्रसारित होईल.

****

डिजिटल इंडिया कार्यक्रमाअंतर्गत भारतीय वायू दलानं डिजीलॉकर व्यासपीठाशी एकात्मीकरण करुन आपला परिवर्तनशील डिजिटल प्रवास सुरु केला आहे. डिजीलॉकरशी एकीकरण करुन भारतीय हवाई दलातल्या विविध प्रक्रिया सुव्यवस्थित करणार आहे. यामध्ये अग्निवीर वायु भरतीचाही समावेश असून, उमेदवाराच्या शैक्षणिक दस्तऐवजांची डिजिटल पद्धतीने पडताळणी केली जाईल.

****

चारधाम यात्रेसाठीची सर्व तयारी पूर्ण झाली असून, यंदा सुमारे १६ लाख भाविकांनी या यात्रेसाठी नोंदणी केली असल्याचं उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी सांगितलं. चारधाम यात्रेत यमुनोत्री, गंगोत्री, केदारनाथ आणि बद्रीनाथ या चार तीर्थस्थळांना भाविक भेट देतात.

****

ठाणे इथं पाच लाख ६० हजारांची रक्कम उकळणाऱ्या तोतया वन अधिकाऱ्याला ठाणे गुन्हे अन्वेषण विभागाच्या विशेष कृती दलानं काल अटक केली. शीळ डायघर भागातल्या अनधिकृत बांधकामाची वारंवार तक्रार करुन त्याची तडजोड करण्यासाठी त्यानं या लाचेची मागणी केली होती. त्याच्याकडून खंडणीतील पाच लाख ६० हजारांची रोकड आणि तीन मोबाईल फोन जप्त करण्यात आले.

****

नांदेड इथून सुटणारी नांदेड – अमृतसर सचखंड एक्सप्रेस आज दुपारी तीन वाजता सुटणार आहे. दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागाकडून ही माहिती देण्यात आली.

****

इंडियन प्रिमियर लीग आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज दोन सामने होणार आहेत. दुपारी साडे तीन वाजता दिल्ली कॅपिटल्स आणि मुंबई इंडियन्स संघादरम्यान सामना होणार आहे. तर दुसरा सामना संध्याकाळी साडे सात वाजता लखनौ सुपर जायंट्स आणि राजस्थान रॉयल्स संघादरम्यान होणार आहे.

****